RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे अंग्रेजी बोलना सिखानेके लियेही हम जाने जाते है।
9028851719

# BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451

गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २४८ | दैनिक | किंमत : ₹५/-
Thuesday, 27 November 2025 | Year : 5 | Issue : 248 | Daily | Rate: Rs. 5/-

# नागपुरात उभा राहिला भारतातील पहिला 'संविधान चौक'!

## नागपूरच्या परिवर्तनयात्रेची तेजस्वी कहाणी



संविधान चौक नामकरणाचा फलक लावताना नागपुरातील आंबेडकरी कार्यकर्त्यांसह नरेश वाहाणे.

**नागपूर :** क्रांतीभूमी, धम्मभूमी आणि दीक्षाभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपूरच्या मध्यवर्ती भागातील ऐतिहासिक आरबीआय चौकाचे 'संविधान चौकात' झालेले रूपांतर ही केवळ नामांतराची घटना नसून सामाजिक-जागृतीच्या चळवळीला नवी उभारी देणारी क्रांतिकथा आहे. महाराष्ट्राच्या उपराजधानीत, देशाच्या मध्यबिंदूवर उभा असलेला 'संविधान चौक' हा भारतातील (बहुतेक) पहिला आणि अद्वितीय असा संविधानाला वाहिलेला सार्वजनिक स्तंभ आहे. नागपूरचे आरबीआय चौक हे रिझर्व्ह बँक, विधानभवन, मॉरिस कॉलेज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भव्य पुतळ्यामुळे राजकीय-सामाजिक आंदोलनांचे केंद्रस्थान राहिले आहे. अन्यायग्रस्तांचा आक्रोश, संघर्ष आणि न्यायासाठीचे हुंकार इथूनच उठतात. अशा या क्रांतिभूमितूनच संविधानाचा जागर सुरू झाला. काही संघटना आपापल्या स्तरावर संविधानानिमित्त जनजागृती करीत होत्या. परंतु सन 2005 मध्ये नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे शाळांमधून सामूहिक वाचन हा 'संविधान ओळख' उपक्रम सुरू केला आणि याला व्यापक स्वरूप आले. याच दिवशी 26 नोव्हेंबर 2005 आरबीआय चौकातून भव्य 'संविधान रॅली' निघाली. त्यानंतर याला लोकचळवळीचे व्यापक स्वरूप येऊ लागले. या जागरामुळे आणि ई.झेड. खोब्रागडे यांच्या पाठपुराव्यामुळे 24 नोव्हेंबर 2008 रोजी महाराष्ट्र शासनाने 26 नोव्हेंबरला 'संविधान दिन' घोषित केले. 26 नोव्हेंबर 2011 रोजी संविधान दिनानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीदरम्यान, कवी इ. मो. नारनवरे यांनी 'आरबीआय चौकाचे अनन्य साधारण महत्त्व लक्षात घेऊन या चौकाचे संविधान चौक' असे नामकरण करण्यात यावे, अशी सूचना केली. ही सूचना तिथे उपस्थित असलेल्या डॉ. नितीन राऊत, भदंत विमलकीर्ती गुणसीरी, भदंत सदानंदजी यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते व कार्यकर्त्यांनी स्वागताने मान्य केली. नागपूरकरांनीही ती उचलून धरली.

### ...अन कार्यकर्त्यांनी रात्रभरात उभारला संविधान चौकाचा नामफलक

आरबीआय चौकाचे नाव संविधान चौक करण्याबाबत नागपूरकरांकडून महानगरपालिकेकडे रितसर प्रस्ताव सादर करण्यात आला. महापौरांनी आश्वासन दिले. महापालिकेत संविधान चौक नामकरणाचा ठराव होणार असल्याचे संकेत मिळाले. परंतु निर्णय काही होत नव्हता. पाठपुरावा केल्यानंतरही निर्णय होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळत होती. यातच या चौकाला काही राजकीय नेत्यांचे नाव देणार असल्याच्या चर्चाही उठत होत्या. त्यामुळे लोकांमध्ये अस्वस्थता होती. 22 नोव्हेंबर 2012 रोजी एका कार्यशाळेत यावर चर्चा झाली. ई.झेड. खोब्रागडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते होते. यात मनपा निर्णय घेत नसेल तर आपणच नामकरण करू, ठरले. कार्यकर्त्यांनी जागा पाहिली. 25 नोव्हेंबर रोजी रात्री नामकरणाचा फलक लावण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या रात्री रवी शेंडे, नरेश वाहने, राजन वाघमारे, दिवंगत बबन बोंदाडे, बाळू घरडे, सुधीर ढोके, दिलीप पाटील, महिपाल गेडाम, राजू डोंगरे, संघपाल उपरे, दिनेश अंडरसहारे, प्रकाश कुंभे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी ठरल्यानुसार भला मोठा लोखंडी फलक आणला. मिलिंद भगत यांनी त्यावर संविधान चौक असे नाव लिहून दिले होते. ते सुद्धा सहभागी होते. आरबीआयवर फलक आणला गेला. रोड डिव्हाडरच्या मध्ये खोदून फलक बसवण्यात आला. सिमेंट रेतीने तो पक्का करण्यात आला. अशा प्रकारे रात्रभरात फलक उभा राहिल्या. दुसऱ्या दिवशी संविधान दिनी दूरवरून हा फलक लक्ष वेधून घेत होता. लोकांनी त्याचे स्वागत केले. लोकचळवळीमुळे महानगरपालिका हलली. पुढच्या वर्षी 2013 मध्ये महानगरपालिकेने अधिकृत ठराव करून 'संविधान चौक' हे नाव दिले.

### भारतीय संविधानाचा ड्राफ्ट टाईप करणारा ऐतिहासिक टाईपराईटर कुठे आहे?

**नागपूर :** भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधान सभेचे अध्यक्ष होते. त्या काळात देशाला योग्य असे 'संविधान' देण्याची महत्त्वाची जबाबदारी त्यांनी पार पाडली. हे संविधान ज्या टायपरायटरवर टाइप केले गेले, तो टायपरायटर सध्या नागपुरातील चिचोली येथील शांतिवन मधील डॉ. बाबासाहेबांच्या वस्तु संग्रहालयात जपून ठेवण्यात आला आहे. याशिवाय बाबासाहेबांशी संबंधित इतर अनेक वस्तुही येथे संग्रहित आहे. या सर्वांचे दर्शन घेण्यासाठी लाखोंच्या संख्येने नागरिक शांतिवनला भेट देतात.

### संविधानाची मूळ प्रत नागपूरच्या दीक्षाभूमीला...

**नागपूर :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले भारतीय संविधान हे जगभरातील देशासाठी प्रेरक मानले जाते. अमलात आणल्यापासून त्यात अनेक सुधारणा झाल्या आहेत व हीच लवचिक विशेषत: त्यात आहे. मात्र, त्यावेळी संसदेत अनेक दिवस चर्चा करून तयार झालेली संविधानाची मूळ प्रत देशासाठी महत्त्वाचा दस्तावेज होय. ही दुर्मीळ मूळ प्रत भारतीय संसदेसह देशात काही निवडक ठिकाणीच ठेवली आहे. तो मान नागपूरच्या दीक्षाभूमीलाही मिळाला आहे. बाबासाहेबांचे विश्वासू दादासाहेब गायकवाड यांनी ही प्रत त्यावेळी दीक्षाभूमीला भेट दिली होती, जी आजही येथे संग्रही आहे.

# वॉक फॉर संविधानाला प्रचंड प्रतिसाद




**नागपूर :** 26 नोव्हेंबर या संविधान दिनाच्या निमित्ताने संविधान फाउंडेशन, युवा ग्रॅज्युएट फोरम, सम्यक थिएटर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशन (बाहो) यांच्या संयुक्त विद्यमाने वॉक फॉर संविधानचे यशस्वी आयोजन केले गेले. यात कबिरा कान्हेंट आणि सेंटर प्राव्हिडेंस स्कूलचे विद्यार्थी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, राजश्री शाहू महाराज, सिंधू सपकाळ, बिरसा मुंडा यांची लक्षवेधक वेशभूषा करून आले होते तर बाकीचे विद्यार्थी वेगवेगळ्या राज्यांची पारंपरिक वेशभूषा करून आले होते. महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड, नागालँड, पंजाब या राज्यांच्या वेशभूषेमध्ये आलेल्या महिलांनी रॅलीची शोभा वाढवली.

कार्यक्रमाची सुरुवात रंजना सुरजुसे यांनी संविधानाचे प्रास्ताविक वाचन करून केले. कार्यक्रमाचे संचालन पल्लवी वानखेडे यांनी केले प्रस्ताविक अतुल खोब्रागडे यांनी केले. गेल्या सात वर्षांपासून होत असलेल्या वॉक फॉर संविधान मागची संकल्पना त्यांनी थोडक्यात स्पष्ट केली. माजी सनदी अधिकारी ई.झेड. खोब्रागडे यांनी आपल्या भाषणात भारतीय संविधानाचे महत्त्व स्पष्ट केले. आज ज्या पद्धतीने संविधानाची उपेक्षा



केली जात आहे यावर त्यांनी चिंता व्यक्त केली. देशात सध्याच्या स्थितीत नागरिकांच्या मुलभूत हक्कांवर गदा आणण्याचे प्रयत्न आपण हाणून पाडले पाहिजेत. देशात ओबीसी, आदिवासी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या आरक्षणावर घाला घालण्याचे प्रकार वाढले आहेत. यावर आळा घालायचा असेल तर आपण आपल्या संवैधानिक अधिकारांप्रती नेहमी जागरूक राहणे गरजेचे आहे असे विचार त्यांनी आपल्या छोटेखानी भाषणात मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशन (बाहो)चे अध्यक्ष असलेले डॉ. सुशांत मेश्राम, डॉ. बी.एस. गेडाम, इंजि. अनिल रामटेके, रेखा खोब्रागडे यांनी संविधान दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. आभार प्रदर्शन धर्मानंद मनवर यांनी केले. डॉ. महेंद्र कुमार मेश्राम, दिपक निरंजन, विजय बेले, डी.डी. गोंडाणे, यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाला नागरिकांची प्रचंड उपस्थिती होती.

# 26/11 अतिरेकी हल्ल्याला 17 वर्षे पूर्ण


मुंबईतील 26/11 दहशतवादी हल्ल्याला 17 वर्षं पूर्ण

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससह (सीएसएमटी) मुंबईतील इतर ठिकाणी 26 नोव्हेंबर 2008 रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्याला 17 वर्षे उलटूनही उपनगरी आणि लांब पल्ल्याच्या रेल्वे स्थानकांवरील सुरक्षा व्यवस्था अद्यापही अपुरीच आहे. महत्त्वाच्या सीएसएमटी स्टेशनवर एकही बॉडी स्कॅनर नाही. तर, बॅग तपासणीसाठी फक्त एकमेव स्कॅनर कार्यरत आहे. सुरक्षा व्यवस्थेच्या या बेपर्वा वृत्तीमुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. सीएसएमटीवरून दररोज सुमारे 8 लाख जण प्रवास करतात. या ठिकाणी आरपीएफ आणि जीआरपीचे पथक परिसरात तैनात असले तरी प्रवाशांच्या बॅगा किंवा व्यक्तिगत तपासणीची कोणतीही प्रभावी यंत्रणा नसल्याने सुरक्षा धोके कायम आहेत. प्रवाशांच्या मते, दिल्लीत झालेल्या अलीकडच्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर दोन दिवस सुरक्षा वाढवली गेली होती; मात्र, त्यानंतर पुन्हा निष्काळजीपणा दिसून आला. पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल टर्मिनसवर असलेले बॅगेज स्कॅनर गेल्या काही दिवसांपासून बंद असून, स्टेशनवर प्रवाशांची तपासणी होतच नाही. अशा परिस्थितीत प्रवाशांच्या सुरक्षेबाबत प्रशासन किती जागरूक आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. देशाची आर्थिक राजधानी मुंबईवरील 26/11 च्या दहशतवादी हल्ल्याला बुधवारी सतरा वर्षे पूर्ण होत आहे. पण कालानुरूप केलेल्या उपाययोजनांमुळे मुंबई पोलिस अशा हल्ल्यांनर तोंड देण्यासाठी सज्ज आहे. तसेच याच पार्श्वभूमीवर कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून मुंबई पोलिसांनी शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे.

# ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या जाहीर सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद





**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आज मुंबईत आयोजित जाहीर सभेला जनसागर उसळला. सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे रक्षण आणि महाराष्ट्राच्या राजकीय भवितव्याबाबत निर्णायक संदेश देत ही सभा उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडली. सभेला प्रचंड गर्दी होताच कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विविध जिल्ह्यांतून युवक, महिला, कामगार, विद्यार्थी आणि बहुजन समाजातील घटक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. आंबेडकरांचे भाषण 'संविधान व लोकशाही वाचवण्याचा निर्धारआपल्या दमदार भाषणात ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की 'आज देशात लोकशाही धोक्यात आहे. संविधानिक हक्कांसाठी उभे राहणारा प्रत्येक नागरिक हा आमचा सैनिक आहे. सत्ता कोणाचीही असो संविधानावरील आघात हा आम्ही कधीही सहन करणार नाही. त्यांनी बेरोजगारी, महागाई, आरक्षण, ओबीसी जनगणना, शेतकरी कर्जमाफी, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील संकट यावर सरकारची कडक शब्दांत समीक्षा केली. यावेळी त्यांनी सरकार बदलण्याची नव्हे तर व्यवस्थाच बदलण्याची गरज अधोरेखित केली. 'जय भीम!', 'वंचितचा जयजयकार!', 'संविधान बचाव, देश बचाव!' या घोषणांनी परिसर दुमदुमला. युवकांच्या सहभागाने वातावरण भारावून गेले.

## महत्त्वाच्या बातम्या

### संविधान दिनानिमित्त भाजप साधला निशाणा

**लखनऊ :** समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव म्हणाले, 'येथे आपण पाहतो की भाजपने संविधान दिन साजरा केला आणि त्यांनी बाबा साहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाचे सर्वात मोठे नुकसान केले आहे. सरांच्या बहाण्याने ते (भाजप) कोट्यवधी लोकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवू इच्छितात. उत्तर प्रदेशात कोट्यवधी लोक राहतात. जेव्हा आपला मतदानाचा अधिकार संरक्षित असेल तेव्हाच संविधान मजबूत होईल.' समाजवादी पक्षाचे (सपा) प्रमुख अखिलेश यादव यांनी संविधान दिनानिमित्त भारतीय जनता पक्षावर (भाजप) निशाणा साधला आणि संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्याची गरज यावर भर दिला.

### जय हिंद आणि वंदे मातरम या घोषणांबद्दल मुख्यमंत्री ममता यांना प्रश्न

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यसभेने जारी केलेल्या एका बुलेटिनवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे, ज्यामध्ये सभागृहात धन्यवाद, धन्यम, जय हिंद, वंदे मातरम किंवा इतर कोणत्याही घोषणा देण्यास मनाई आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना वंदे मातरम आणि जय हिंद बद्दल विचारले असता त्यांनी सांगितले की, 'आम्ही ते का म्हणणार नाही? आम्ही बंगालीमध्ये जय बांगला म्हणतो. आम्ही वंदे मातरम म्हणतो. हा आमचा स्वातंत्र्यांचा नारा आहे. हा आमचा राष्ट्रगीत आहे. जय हिंद हा नेताजींचा (सुभाषचंद्र बोस) नारा आहे. आम्ही त्यासाठी लढलो. हा आमच्या देशाचा नारा आहे. जो कोणी त्याच्याशी टक्कर देईल त्याला चिरडून टाकले जाईल.'

### सरकारी तिजोरीवर ताण, ठेकेदारांचे अद्यापही 19 हजार कोटी देणे

**मुंबई :** कंत्राटदारांची मोठ्या प्रमाणावर थकबाकी राहिल्याने आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. अखेर सरकारकडून रस्ते, पूल, सरकारी कार्यालये, शासकीय इमारतींची उभारणी तसेच देखभाल दुरुस्तीपोटी थकलेली देयके कंत्राटदारांना अदा करण्यात आली आहेत. आतापर्यंत 20 हजार कोटी रुपयांची देयके देण्यात आली असून अद्यापही जवळपास 19 हजार कोटी रुपयांची देयके थकीत आहेत. ही देयकेही दिली जाणार असून हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात येणाऱ्या पुरवणी मागण्यांत 10 हजार कोटींची पुरवणी मागणी सादर करण्यात येणार आहे .निवडणुकांच्या तोंडावर जाहीर करण्यात आलेल्या लोकप्रिय घोषणांमुळे सरकारी तिजोरीवर मोठ्या प्रमाणात ताण येत होता. एकट्या लाडक्या बहीणीसाठी 45 हजार कोटींचा भार सरकारला उचलावा लागत आहे. परिणामी याचा ताण सर्वच सरकारी खर्चावर आला असून कंत्राटदारांची मोठ्या प्रमाणावर देयके रखडली होती.

### मतदार यादीतून 14 लाख नावे वगळली जातील...

**कोलकाता :** बंगालमध्ये 14 लाख मतदारांची नावे वगळण्यात येणार आहेत. बंगालमध्ये 4 नोव्हेंबर 2025 रोजी विशेष सघन पुनरावृत्ती सुरू करण्यात आली. मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्तीमध्ये आतापर्यंत किमान 14 लाख मतदार वगळण्यात आले आहेत असा अंदाज आहे. तथापि, ही आकडेवारी निवडणूक आयोगावर आधारित आहे. बंगालमध्ये किमान 14 लाख मतदारांची नावे मसुदा यादीतून गहाळ आहेत. घरोघरी जाऊन फॉर्म वाटप करताना आणि पूर्ण झालेले फॉर्म गोळा करताना बूथ-स्तरीय अधिकाऱ्यांनी ही माहिती मिळवली. 24 नोव्हेंबर रोजी हा आकडा 10 लाख होता आणि बुधवारपर्यंत तो 14 लाख झाला होता. यापैकी अंदाजे 670,000 मतदार मृतावस्थेत आढळले आहेत. याव्यतिरिक्त, अनेक बनावट, हस्तांतरित आणि बेपत्ता मतदार आहेत. अनेक लोकांची नावे एकापेक्षा जास्त बूथवर नोंदणीकृत आहेत. सर्व फॉर्म डिजिटायझेशन झाल्यानंतरच हटवलेल्या नावांची खरी संख्या कळेल. दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्या भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत

# जगाची न्यायव्यवस्था भारताकडून शिकते : अनेक देशांतील न्यायाधीश

**नवी दिल्ली :** या वर्षी भारताच्या सर्वोच्च न्यायालयात संविधान दिनाचा सोहळा आंतरराष्ट्रीय चर्चेचा विषय बनला, ज्यामध्ये विविध देशांचे सरन्यायाधीश आणि वरिष्ठ न्यायाधीश उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालयात झालेल्या या कार्यक्रमात परदेशातील न्यायिक प्रतिनिधींनी केवळ न्यायालयीन कामकाजाचे बारकाईने निरीक्षण केले नाही तर भारताच्या कायदेशीर परंपरा आणि संवैधानिक ताकदीचे उघडपणे कौतुक केले. बुधवारी झालेल्या कार्यक्रमात सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. संविधान दिनानिमित्त, परदेशी न्यायाधीशांनी सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजाचे निरीक्षण केले आणि भारताच्या न्यायव्यवस्थेचे वर्णन जगातील सर्वात मजबूत मॉडेलपैकी एक म्हणून केले. या कार्यक्रमाला भूतान, केनिया, मॉरिशस आणि श्रीलंकेचे मुख्य न्यायाधीश उपस्थित होते. सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, हा प्रसंग ऐतिहासिक होता, कारण राष्ट्रपती देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनीही परदेशी पाहुण्यांचे स्वागत केले आणि भारतीय न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा अधोरेखित केली. 1949 मध्ये भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिन, ज्याला अनेक देशांचे सर्वोच्च न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयात एकत्र उपस्थित होते




**मॉरिशसच्या** पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश रेहाना बीबी मुंगली-गुलबुल यांनी भारताच्या न्यायालयीन व्याख्यांना त्यांच्या देशाच्या कायदेशीर व्यवस्थेचा एक महत्वाचा आधारस्तंभ म्हणून वर्णन केले. त्या म्हणाल्या की भारताचे निकाल मॉरिशसच्या न्यायालयांना दिशा देतात. **केनियाच्या** मुख्य न्यायाधीश मार्था के. कूम म्हणाल्या की त्यांचा देश भारताच्या कायदेशीर वारशापासून आणि न्यायिक पद्धतींपासून सतत शिकत असतो. कायद्याचे राज्य मजबूत करण्यासाठी भारतासोबत भागीदारी सुरू ठेवण्याबद्दल त्यांनी सांगितले. दिल्ली विद्यापीठाच्या कॅम्पस लॉ सेंटरचे माजी विद्यार्थी **भूतानचे** मुख्य न्यायाधीश लियोन्पो नोर्बू त्शेरिंग यांनी भारताचे वर्णन 'अत्यंत कार्यक्षम, व्यावसायिक आणि संसाधनांनी समृद्ध देश' असे केले. त्यांनी नमूद केले की भारतीय संविधानात 106 सुधारणा झाल्या आहेत, तरीही त्याची मूलभूत रचना अबाधित आहे. **श्रीलंकेच्या** मुख्य न्यायाधीश प्रीती पद्मन सुरसेना यांनी दोन्ही देशांमधील कायदेशीर आणि सांस्कृतिक समानतेवर प्रकाश टाकत सांगितले की भारत आणि श्रीलंका न्याय आणि परंपरांच्या सामायिक मूल्यांनी बांधलेले आहेत. भारतीय न्यायव्यवस्थेच्या आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेवर भर देत, ज्येष्ठ वकील **राकेश द्विवेदी** यांनी परदेशी न्यायाधीशांचे स्वागत केले, भारत आणि हे देश वसाहतवादी इतिहास आणि स्वातंत्र्यलढ्याच्या आठवणी सामायिक करतात असे नमूद केले. ते म्हणाले की भारताचे संविधान आणि न्यायिक मार्ग जगभरातील अनेक देशांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत. सर्वोच्च न्यायालयात परदेशी न्यायाधीशांची उपस्थिती केवळ न्यायिक सहकार्य मजबूत करत नाही तर जागतिक न्यायव्यवस्थेत भारताची वाढती भूमिका देखील अधोरेखित करते.

# मनुस्मृतीवरून खरगे यांचा भाजप आणि संघावर तीव्र हल्ला



**नवी दिल्ली :** काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी 75 व्या संविधान दिनानिमित्त म्हटले आहे की, 'संविधान दिनानिमित्त सर्व देशवासीयांना हार्दिक शुभेच्छा. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित नेहरू यांनी संविधान सभेसह असा भारत निर्माण केला जिथे लोकशाही सर्वोपरि आहे. समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही भारताची ओळख बनली आहे, परंतु आज ही ओळख धोक्यात आहे. आरएसएसचा आदर्श मनुस्मृती आहे. आजची विडंबना अशी आहे की संविधानापेक्षा मनुस्मृतीवर अधिक विश्वास ठेवणारे आता सत्तेत आल्यानंतर संविधानाला आपलेसे करण्याचा प्रयत्न करीत आहेत.'

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी 75 व्या संविधान दिनानिमित्त देशवासीयांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि भारतीय संविधानाला राष्ट्राची जीवनरेखा म्हणून वर्णन केले, जे आपल्या पूर्वजांनी मोठ्या प्रयत्नांनी आणि काळजीने तयार केले. ते म्हणाले की संविधान भारतातील प्रत्येक व्यक्तीला सक्षम करते आणि गरीब आणि दुर्बलांचा आवाज आहे. खर्गे यांनी यावर भर दिला की संविधान सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकारांची हमी देते आणि भारताला एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक बनवते. या ऐतिहासिक प्रसंगी, त्यांनी संविधान सभेचे कौतुक केले आणि त्यांच्या सदस्यांच्या दूरदृष्टी आणि शहाणपणाचे स्मरण केले आणि त्यांच्या प्रचंड योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तथापि, त्यांनी चिंता व्यक्त केली की संविधान अजूनही धोक्यात आहे आणि ते भविष्यातील पिढ्यांसाठी जतन केले पाहिजे. खर्गे यांनी यावर भर दिला की संविधान स्वीकारल्याच्या 75 व्या वर्षी, भारताच्या अंतर्निहित तत्वज्ञानाचे रक्षण करण्यासाठीचा संघर्ष राष्ट्रीय चळवळीच्या काळात होता तसाच पुन्हा जिवंत आणि जागृत केला पाहिजे.

# सोलापूरमध्ये निघाला संविधान बचाव महामोर्चा




संवादमित्र महेश गायकवाड,

**सोलापूर :** सोलापूरमध्ये प्रचंड मोठा संविधान बचाव महामोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून काढण्यात आला दुपारी मोर्चास सुरवात झाली. या मोर्चाला अगोदरच काँग्रेसने जाहीर पाठिंबा दिला होता. खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली चेतनभाऊ नरोटे यांच्या नेतृत्वात शेकडो कार्यकर्त्यांनी यास महामोर्चात सहभाग घेतला होता. भाजपाचा संविधान बदलण्याचा कुटील डाव असल्याचा आरोप याप्रसंगी बोलतांना काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांनी केला. सोलापू येथील संविधान बचाव समिती, सोलापूरच्या वतीने आज काढण्यात आलेल्या महामोर्चात काँग्रेस पक्षाने मोठ्या ताकदीने सहभाग नोंदवत जाहीर पाठिंबा दर्शविला. महामोर्चात माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, अशोक जानराव, सुभान बनसोडे, जनार्दन शिंदे, राजाभाऊ सोनकांबळे, सच्चिनंद व्हटकर, अशोक आगवणे, रॉकी बंगाळे, गौतम मसालखांब, धर्मेंद्र चंदनशिंवे, मिलिंद प्रक्षाळे यांच्यासह इतर सामाजिक आणि राजकीय संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते. '*संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध आहे, कारण संविधान हीच आपली ढाल आणि हीच आपली संजीवनी आहे,*' असे काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांनी आज महामोर्च्यात बोलतांना स्पष्ट केले. संविधान वाचवण्यासाठी संघर्ष अनिवार्य आहे आणि हा लढा आम्ही थांबवणार नाही.'

महामोर्चाचा उद्देश संविधानाची अखंडता, सामाजिक न्याय, समता आणि अधिकारांचे संरक्षण याबाबत जनजागृती करणे हा होता. या महामोर्चात चेतनभाऊ नरोटे, संजय हेमगड्डी, अरिफ शेख, सुशिला आबुटे, रियाज हुंडेकरी, प्रमिला तुपलंवडे, श्रीशैल रणधिरे, जुबेरभाई कुरेशी, देविदास गायकवाड, ॲड. केशव इंगळे, मधुकर आठवले, रॉकी बंगाळे, संजय गायकवाड, सागर उबाळे, बंटी चंदनशिवे, गौतम मसालखांब, संध्या काळे, संघमित्रा चौधरी, डॉ. मीना गायकवाड, सुभाष वाघमारे, माया कांबळे, लता सोनकांबळे, युवराज जाधव, वाहिद बिजापूरे, लक्ष्मीकांत साका, तिरुपती परकीपडंला, मोहसीन महेंद्रीकर राजेंद्र, शिरकुल माजी, हारून शेख, शोएब महागामी, एजाज बागवान, ज्ञानेश्वर जाधव, इम्तियाज यादगिर, सुमन जाधव, शुभांगी लिंगराज, सलीम शेख, निशा मरोड, छाया हिरवटे, मुमताज तांबोळी रेखा बिनेकर, रोहिणी गायकवाड अनिता भालेराव, मल्लेश सूर्यवंशी, आप्पा सलगर शिवाजी साळुंखे, मल्लेश सूर्यवंशी, नागनाथ शावणे, समीर बिजापूरे, पप्पू गारे, संजय गायकवाड, बालाजी जाधव, सुनील डोळ्से, सन्नी जाधव, सुनीता गायकवाड, उमेश गाडे, साई शिंदे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

बहुजन सौरभ संपादकीय

# नवतरुणांनो, उद्योगात या!

भारत आज जगातील सर्वात वेगाने प्रगती करणाऱ्या राष्ट्रांमध्ये गणला जातो. लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे आणि त्याच अनुषंगाने गरजांची व्याप्तीही प्रचंड वाढली आहे. या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी उद्योजक निर्माण होणे ही काळाची अत्यावश्यक गरज आहे. हे सत्य जितके स्पष्ट, तितके दुर्लक्षित. शासकीय नोकऱ्यांची मर्यादित संख्या, अस्थिर रोजगार आणि वाढती स्पर्धा पाहता, नोकरी मागणाऱ्या नव्हे तर नोकरी देणाऱ्या तरुणांची फळी निर्माण होणे ही आजची तीव्र गरज आहे. स्वप्न पाहणारा प्रत्येक तरुण जर धैर्याने उद्योग क्षेत्रात उतरला, तर 100 एकर जागा, 100 कोटींचा टर्नओव्हर आणि 100 वर्ष टिकणारा उद्योग हे स्वप्न अशक्य नाही. यासाठी समाज, जात, परिस्थिती किंवा भौगोलिक अडथळे महत्त्वाचे नाहीत, महत्त्वाची आहेत जिद्द, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाची तयारी. संकटांमध्ये संधी, इतिहास प्रेरणा देतो.

संविधानाच्या 75 वर्षांच्या वाटचालीत देशाने अनेक संकटांना तोंड दिले आहे. बेरोजगारी, उत्पन्नाची अस्थिरता, बाजारातील स्पर्धा, नैसर्गिक संकटे आणि असमान प्रणाली, ही वास्तव परिस्थिती आहे. परंतु संकटे म्हणजे शेवट नव्हे तर सुरुवात करण्याची नवीन संधी. इतिहासाचा एक पान पाहिले तरी समजते की ब्रिटिश काळात चंद्रपूर जिल्ह्यातील अस्पृश्य समाजाने व्यापार क्षेत्रात उतरून स्वतःची ओळख निर्माण केली. आजही गोल बाजारातील दुकाने त्या संघर्षाची आणि यशाची साक्ष देतात. हा इतिहास आजच्या तरुणांना स्पष्ट सांगतो की, अडथळे असले तरी यशाला मर्यादा नाहीत. संधी घराच्या दारात उभ्या आहेत. गरज फक्त पुढे येण्याची गरज आहे. भारताकडे जल, जंगल, जमीन, रस्ते आणि रेल्वे यांसारखी विपुल साधनसंपत्ती आहे. वेगवान शहरीकरण, डिजिटल क्रांती आणि नवे बाजारपेठेचे मॉडेल. सर्व काही उद्योजकतेस अनुकूल आहे. गावांचे स्वरूप बदलले आहे. मुख्य रस्त्यावर आलेल्या घरे आज हॉटेल, लॉज, मोटार गॅरेज, दवाखाना, खानावळ, किराणा, घरपोच सेवा, ऑनलाइन मार्केटिंग यासाठी अवसर ठरू शकतात. लहान सुरूवातीचा कमीपणा नाही; मोठेपणा त्या सुरूवातीची दिशा ठरवतो. लघुउद्योजक हे अर्थव्यवस्थेचे खरे रक्तवाहक आहे. आज घराघरात टिफिन सेवा, पापड, लोणची, मसाले, बॅग मॅन्युफॅक्चरिंग, हस्तकला, फ्रीलान्सिंग, डिजिटल मार्केटिंग, ऑनलाइन ट्यूशन यासारख्या व्यवसायांनी हजारो कुटुंबांना स्थैर्य दिले आहे. विशेष म्हणजे महिलांनी उद्योजकतेत अभूतपूर्व ताकद दाखवली आहे. लघुउद्योगांना भांडवल कमी लागते, पण बाजार असीम असतो. त्यामुळे तरुणांनी व्यवसायाची भीती न बाळगता त्यामध्ये धाडसाने उतरणे गरजेचे आहे. भविष्याची उद्योग ओळख - जो बदल स्वीकारेल, तोच जिंकेल. आगामी काळात खालील क्षेत्रांमध्ये प्रचंड व्यवसाय संधी निर्माण होत आहेत, डिजिटल मार्केटिंग, ऑनलाइन शिक्षण, ईव्ही (इलेक्ट्रिक व्हेईकल) सेवा. कृषी तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक पॅकेजिंग, हेल्थकेअर व वेलनेस उद्योग या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उघडी आहे. शेतीचे व्यावसायीकरण हा उद्योजकतेचा नवा मार्ग आहे. व्यापारी शेती म्हणजे स्थानिक गरजांसाठी नव्हे तर बाजारपेठेसाठी पिके घेणे. गट शेती, भागधारक पद्धत आणि निर्याताभिमुख उत्पादन - या मॉडेल्सने अनेक शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. सिंदीविहिरी (कारंजा, वर्धा) येथून भाजीपाला परदेशात जातो. हा यशाचा मार्गदर्शक दीप आहे. यशाची गुरुकिल्ली नशिबात नाही, स्वनिर्मितीत आहे. यशाची वाट कधीच सोपी नसते. पण उद्योग हा संघर्षातून घडणारा विजय आहे. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी व्यवसाय योजना तयार करणे, बाजारपेठेचा अभ्यास, नियंत्रित गुंतवणूक, आर्थिक शिस्त ही चार तत्त्वे अवलंबली तर स्थैर्य मिळते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, वाईट व्यसनांपासून दूर राहणे आणि आयुष्याचे उद्दिष्ट स्पष्ट ठेवणे. उद्योजकता हेच भविष्य आणि ते भविष्य तरुणांच्या हातात आहे. टाटा, बिर्ला, अंबानी, किर्लोस्कर यांसारख्या घराण्यांनी पिढ्यान्‌पिढ्या उद्योगांची परंपरा टिकवून ठेवली. परंतु उद्योग करण्यासाठी घराण्याचा वारसा लागतो, हा विचारच चुकीचा आहे. उद्योगासाठी लागते ते, धैर्य, कौशल्य, दृष्टी आणि सातत्य, आजच्या तरुणांपुढे दोन वाटा आहेत, नोकरीसाठी भटकत बसणे की स्वतःचा व्यवसाय सुरू करून इतरांना रोजगार देणे. निवड तुमची आहे; संधी प्रचंड आहे; यश शक्य आहे. देशाला उद्योजक तरुणांची गरज आहे. आर्थिक स्वातंत्र्य, समाज परिवर्तन आणि राष्ट्रनिर्माणाचा मार्ग उद्योगातूनच जातो. म्हणूनच आवाहन आहे - नवतरुणांनो, उद्योगात या! आपले भविष्य, आपल्या हातात! ■ ■

# संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरच

**भारताचे संविधान हा केवळ कागदावर उमटवलेला कायद्यांचा संग्रह नाही. तो भारताच्या लोकशाहीचा श्वास आहे, लाखो अत्याचारितांचा न्यायाचा आवाज आहे, वंचितांच्या आशेचा दिवा आहे, आणि शतकानुशतके दबलेल्या समाजाला दिलेली प्रतिष्ठेची पहिली ओळ आहे. हा दस्तऐवज म्हणजे भारतीय लोकशाहीची पायरी, भारतीय स्वातंत्र्याची दिशा आणि भारतीय समाजव्यवस्थेच्या मुक्तीचा मार्ग आहे. असा अद्वितीय ग्रंथ घडवणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.**

आज काही लोक चुकीच्या समजुतीने किंवा अपूर्ण माहितीवर आधारित म्हणतात की, संविधानाचे मुख्य निर्माता बी. एन. राव होते. पण हे ऐतिहासिक सत्याला छेद देणारे, भ्रम निर्माण करणारे आणि राष्ट्रनिर्मितीचा खरा इतिहास अस्पष्ट करणारे विधान आहे. संविधानाच्या निर्मितीचा प्रत्येक दिवस, प्रत्येक मसुदा, प्रत्येक दुरुस्ती आणि संविधान सभेतील प्रत्येक चर्चा हे एका गोष्टीची साक्ष देतात. भारताचे संविधान जर एखाद्या व्यक्तीने आपल्या हृदयातील भावना आणि आयुष्यभराच्या वेदना यांच्यातून घडवले असेल, तर ते व्यक्तिमत्त्व आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्या आयुष्याची कहाणी म्हणजे दगडांवर कोरलेली ज्वाला. स्वतःवर हजारो अपमानांचे ओझे असतानाही त्यांनी कधीही मानवतेवरचा विश्वास ढळू दिला नाही. म्हणूनच संविधान लिहिताना त्यांनी तर्क, न्याय, समता आणि विवेक यांना केंद्रस्थानी ठेवले. ते फक्त कायदेपंडित नव्हते; ते समाजाचे शल्यचिकित्सक होते. त्यांनी भारतीय समाजाचे जखमेचे ठिकाण ओळखले आणि संविधान हे औषध बनवले. त्यांच्या मनी एकच ध्येय होते, 'हा देश सर्वांचा आहे, सर्वांनी समानतेने जगावे.' 29 ऑगस्ट 1947 रोजी संविधान सभेने मसुदा समिती स्थापन केली आणि संपूर्ण सभागृह एकमताने डॉ. आंबेडकरांचे नाव अध्यक्षपदासाठी मांडले. तेव्हा सभागृहातील सदस्य त्यांच्याबद्दल म्हणाले, "There is none better than Dr. Ambedkar to draft the Constitution."

ही केवळ प्रशंसा नव्हती; ती विश्वासाची, आदराची आणि राष्ट्राच्या जाणीवेची घोषणा होती. सभागृहाने ओळखले की भारताला संविधान देण्याचे काम त्या व्यक्तीला द्यावे ज्याने स्वतः दुःखाचे अंधार अनुभवले, पण समाजाला उजेडाचा मार्ग दाखवला.

**मसुदा समितीत सात सदस्य होते :-** डॉ. आंबेडकर, अय्यंगार, अय्यर, मुंशी, सादुल्लाह, मित्तल आणि खैतान. पण हे सात सदस्य नेहमी उपस्थित होते का? नाही. बी. एल. मित्तल यांनी लवकरच राजीनामा दिला. खैतान यांच्या निधनामुळे त्यांची जागा बदलावी लागली. सादुल्लाह अनेकदा अनुपस्थित राहिले. अय्यंगार आणि मुंशी चर्चा करत, पण मसुदा लिहिण्याचे काम नव्हते. म्हणूनच इतिहास सांगतो, मसुदा समिती जरी सात सदस्यांची दिसली, तरी काम करणारा हात एकच होता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर. समोर 7,635 दुरुस्त्या होत्या. प्रत्येक दुरुस्ती मागे एक विचार, एक प्रश्न, एक शक्यता आणि कधीकधी एक संघर्ष असायचा. त्या सर्वांचे विश्लेषण करून, कायदेशीर अर्थ लावून, सामाजिक संतुलन राखून आणि भारताच्या भवितव्याची दिशा ठरवून काम करणारा व्यक्ती दिवस-रात्र परिश्रम करत होता. तो होता डॉ. बाबासाहेब. रात्र उशिरापर्यंत मसुदे वाचणे, दुरुस्त्यांची तपासणी करणे, प्रत्येक कलमाचा तर्कशुद्ध पाया तपासणे, ही त्यांची दिनचर्या होती. त्यांचे जीवनच संविधान झाले होते. त्यांचा श्वास संविधानात मिसळला होता. संविधान म्हणजे त्यांचे स्वप्न, त्यांची वेदना, आणि त्यांची श्रद्धा. इतिहासकार ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी का लिहिले असेल, "Indias Constitution is essentially the handiwork of Dr. Ambedkar." कारण त्यांच्या हातातील प्रत्येक शब्द म्हणजे एका समाजाच्या नवनिर्माणाचे सूत्र होते. आता बी. एन. राव यांच्या भूमिकेकडे पाहू. बी. एन. राव हे "Constitutional Advisor" होते. ते सभागृहाचे सदस्य नव्हते. त्यांनी कधीही संविधान सभा चर्चेत भाग घेतला नाही, त्यांनी कधीही कलमांवर भाषण केले नाही, त्यांनी कधीही दुरुस्त्यांवर प्रत्यक्ष चर्चा केली नाही.



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
9657758555

12 खंड असलेल्या "Constituent Assembly Debates" मध्ये त्यांचे एकही भाषण आढळत नाही. म्हणूनच त्यांना संविधानाचा 'निर्माता' म्हणणे म्हणजे इतिहासाची दिशाभूल करणे होय. संविधान तयार केले, आकार दिला, मूल्य दिले आकार दिला, तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी. जसे विटा आणणारे कामगार असतात, पण घराचा नकाशा, डिझाइन आणि अंतिम रचना आर्किटेक्ट घडवतो, तसेच. संविधानासाठी म्हणून संविधानाचे




वास्तविक निर्माते आंबेडकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी संविधान केवळ कायद्यांचा दस्तऐवज नव्हता; तो सामाजिक न्यायाचा महामंत्र होता. ते म्हणत, "My greatest concern is to protect the interests of the minorities, the depressed classes and all vulnerable sections." हा विचार संविधानाच्या प्रत्येक कलमात ध्वनित होतो. मूलभूत अधिकारांमध्ये त्यांनी समानतेचे दरवाजे उघडले. अस्पृश्यतेवरचा घणाघात संविधानाने केला तो त्यांच्या विचारांच्या जोरावर. राज्यकारभाराचे मार्गदर्शक तत्त्वे, Directive Principles-त्यांच्या समाजवादी आणि मानवतावादी दृष्टिकोनातून जन्माला आली. कलम 32 हे 'संविधानाचे हृदय' त्यांनीच म्हटले, कारण ते नागरिकांना त्यांच्या हक्कासाठी थेट सर्वोच्च न्यायालयाशी संवाद साधण्याचे सामर्थ्य देते. मसुदा समितीचे स्वप्न ते एक हाती पेलत होते. सभागृहातील सदस्य एखाद्या कलमावर शंका उपस्थित करत, तर आंबेडकर उभे राहून त्वरित तर्कसिद्ध, संदर्भनिष्ठ आणि ठाम उत्तर देत. ते भीत नव्हते; ते थकत नव्हते; ते मागे हटत नव्हते. त्यांच्या शब्दांत प्रकाश होता. त्यांच्या उत्तरात समता होती. त्यांच्या विचारात न्याय होता. भारतीय समाजातल्या सर्व दुर्बल, पीडित, अस्पृश्य, वंचित, शोषित लोकांसाठी त्यांनी संविधानात असा पायाभूत पाया रचला की पुढील पिढ्यांना समानतेचे स्वप्न वास्तवात आणणे शक्य व्हावे. म्हणूनच ते म्हणायचे, "Constitution is the only vehicle of social revolution." त्यांनी संविधान लिहिले नाही, ते त्यांनी जगले. संविधानाचा प्रत्येक शब्द म्हणजे त्यांचा श्वास, त्यांची वेदना, त्यांचा आत्मसन्मान. म्हणूनच 25 नोव्हेंबर 1949 रोजी सभागृहात उभे राहून त्यांनी जेव्हा म्हटले, "I am the author of the Constitution as it stands today." तेव्हा भारताने आणि इतिहासाने त्यांच्या कर्तृत्वाला अंतिम शिक्कामोर्तब दिले. आज कोणी म्हणते की संविधानाचे निर्माता राव होते, तर हा इतिहासाचा अपमान आहे. हा त्या व्यक्तीचा अपमान आहे ज्याने आयुष्यभर छळ सहन करूनही संपूर्ण देशाला न्यायाचा दीप दिला. बी. एन. राव यांचे योगदान सल्लागार स्वरूपाचे होते, त्याचा सन्मान असावा. पण संविधानाचे वास्तविक लेखक, मुख्य शिल्पकार, विचारवंत, तत्त्वकार आणि सामाजिक क्रांतीचे शास्त्र म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरच. भारताचे संविधान हे त्यांचेच आहे. त्याची भाषा त्यांची आहे. त्यांचे हृदय आहे. कारण त्यांनी संविधान लिहिले आणि म्हणून त्यांना जगाने स्वीकारले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोलंबिया विद्यापीठाने सन 1953 मध्ये दिलेला "Honorary Doctor of Laws – LL.D." हा सन्मान केवळ एक पदवी नव्हता; तो त्यांच्या बौद्धिक सामर्थ्याचा, आधुनिक भारताच्या घडणीत त्यांनी केलेल्या अमूल्य योगदानाचा आणि विशेषतः भारतीय संविधान निर्मितीत त्यांनी निभावलेल्या अद्वितीय भूमिकेचा जागतिक स्वीकार होता. भारताचे संविधान तयार झाल्यानंतर जगभरातील विद्वानांचे, न्यायतज्ज्ञांचे आणि संशोधकांचे लक्ष भारतावर आणि त्याहूनही अधिक त्या संविधानाच्या प्रमुख शिल्पकारावर केंद्रित झाले. म्हणूनच कोलंबिया विद्यापीठाने, जिथे डॉ. बाबासाहेबांनी आपल्या बौद्धिक उंचीची पायाभरणी केली, त्या डॉ. बाबासाहेबांना जगासमोर ओळख करून देताना त्यांच्या विषयी लिहिले, "The framer of the Indian Constitution, one of the greatest social reformers and statesmen of modern India." हा सन्मान म्हणजे जागतिक पातळीवर भारतीय संविधानाचे प्रमुख निर्माता म्हणून त्यांची झालेली औपचारिक घोषणा होती.

क्रमशः ■ ■

# महिला संघटनांची सध्या गरज का?

केंद्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेमधील 'महिलोन्नती' या अध्यायात म्हटले आहे. 'स्त्री पुरुष ही दोन्ही चाके। जरी परस्पर सहाय्यके। तरीच संसाररथ चाले कौतुके। ग्राम होई आदर्श या ओळीनुसार गाव, राज्य आणि देश आदर्श बनवायचा व विकसित करायचा असेल, तर स्त्री-पुरुषांचा-म्हणजेच पती-पत्नींचा-एकमेकांशी उत्कृष्ट संवाद आणि समन्वय असणे आवश्यक आहे. भारत हा पुरुषसत्ताक देश असल्यामुळे आजही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा पूर्णपणे दिला जात नाही. सिंधू संस्कृतीमध्ये स्त्रीसत्ताक व्यवस्था होती; परंतु आर्यांच्या आगमनानंतर भारतात पुरुषसत्ताक संस्कृती लागू झाली. त्यानंतर स्त्रियांना धार्मिक बंधनांत अडकवण्यात आले आणि त्यांचे अनेक हक्क व अधिकार हिरावण्यात आले.



प्रेमकुमार बोके
मो. 9527912706

परिणामी देशाची अर्धी लोकसंख्या– महिलावर्ग– आपली गुणवत्ता, बुद्धिमत्ता आणि कलागुणांचा विकास करू शकली नाही. देश या कर्तृत्वापासून वंचित राहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे संविधान निर्माण केल्यानंतर खऱ्या अर्थाने स्त्रियांना हक्क आणि अधिकार प्राप्त झाले आणि तेव्हापासून स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुढे येऊ लागली. आज स्त्रियांनी सर्वच क्षेत्रांत आपले वर्चस्व सिद्ध केले असले, तरी तिच्यावरचे अन्याय-अत्याचार पूर्णपणे कमी झालेले नाहीत. अजूनही तिच्याकडे दुय्यमपणे पाहिले जाते. त्यामुळे स्त्रिया संघटित होणे अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी महिला संघटनांची गरज प्रकर्षाने जाणवते.




हीच गरज ओळखून 25 वर्षांपूर्वी जिजाऊ ब्रिगेड या महिला संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेद्वारे गावापासून महानगरापर्यंत महिलांना संघटित करून त्यांच्या विरोधातील अन्याय, अत्याचाराविरुद्ध आवाज उठवण्याचे, महिलांना न्याय मिळवून देण्याचे कार्य सातत्याने केले जाते. महिलांच्या समस्या ओळखून त्या शासनदरबारी मांडणे, आवश्यक तेव्हा रस्त्यावर उतरून आंदोलन, मोर्चे काढणे अशा मार्गांनी सरकारवर दबाव निर्माण करणे. या माध्यमातून महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. आज महिला शिक्षित आहेत, पण स्वतःवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध आवाज उठवायला त्या अजूनही संकोच करतात. त्या दुर्बलतेचा प्रसंगी गैरफायदा घेतला जातो. म्हणूनच महिलांचे संघटित असणे अत्यंत आवश्यक आहे. महिला संघटित असल्या की त्यांच्या प्रश्नांना योग्य वाचा मिळते, एकत्रित आवाजाने प्रश्न सोडवणे सुलभ होते. आज जग बदलले आहे; तंत्रज्ञान, विशेषतः AI मुळे जगण्याचे संदर्भ बदलले आहेत. या बदलत्या काळात महिलांच्या प्रगतीचे विषयही बदलत आहेत. अशा वेळी अर्ध्या लोकसंख्येच्या - महिलांच्या - बुद्धिमत्ता, भावना, कौशल्य, कलागुणांना योग्य संधी देणे आवश्यक आहे. महिलांनी सिद्ध केले आहे की त्या कोणत्याही क्षेत्रात पुरुषांपेक्षा कमी नाहीत. तरीसुद्धा अनेक ठिकाणी तिला 'स्त्री' म्हणून कमी लेखले जाते; धार्मिक क्षेत्रातही अजूनही समान हक्क दिले जात नाहीत. तिच्या दिसण्यावर, कपड्यांवर, बोलण्यावरून तिला ट्रोल केले जाते. त्यामुळे जोपर्यंत स्त्रिया संघटित होऊन आपला हक्क सांगून उभ्या राहत नाहीत, तोपर्यंत तिचे दुर्लक्षण कायम राहील. त्यासाठी स्त्री-मुक्तीचा जागर आवश्यक आहे. महिलांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणाऱ्या जिजाऊ ब्रिगेडसारख्या संघटनांची जबाबदारी आत्ताच्या काळात अधिक वाढली आहे. बदलत्या काळानुसार कार्यपद्धतीत सुधारणा करून महिलांच्या भावविश्वाचे जतन करण्याची गरज आहे. यासाठी विचारवंत, अभ्यासू महिलांच्या समित्या तयार करून त्यांच्याकडे वेगवेगळे विषय सोपवावेत. त्यावर अभ्यास करून 21 व्या शतकात महिला आणखी कशा प्रगत होतील, त्यांचा सन्मान व सुरक्षा कशी सुनिश्चित होईल. यासाठी उपाययोजना राबवाव्यात. जिजाऊ ब्रिगेडसह सर्व महिला संघटनांनी या दिशेने पुढाकार घ्यावा ही अपेक्षा! ■ ■

# गावांचा विकास साधण्यासाठी सरकारला युट्युबरचा ग्राउंड रिपोर्ट वापरता येईल का?




केंद्रग्रामीण भागातून प्रवास करून राज्यातील काही दुर्लक्षित गावांमधील जीवनाचे दस्तऐवजीकरण करणाऱ्या युट्युबर ची वाढती संख्या, त्यांच्या व्हिडिओंमध्ये तुटलेल्या वर्गखोल्यांमध्ये शिकणारी मुले, शौचालये नसलेली कुटुंबे, पिण्याच्या पाण्यासाठी लांब पायी चालणे, जाती-आधारित अलगाव आणि मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. या क्लिप्स अनेकदा अधिकृत अहवालापेक्षा जास्त लोकांपर्यंत पोहोचतात आणि क्वचितच रेकॉर्ड केल्या जाणाऱ्या समस्यांचे बारकाईने दर्शन देतात. प्रश्न सोपा आहे, योजनांचे वितरण करण्यासाठी सरकार या नियमित ग्राउंड रिपोर्ट्सचा वापर करू शकते का? त्यासाठी एक मजबूत आधार आहे. स्थानिक समस्या समजून घेण्याचा एक जलद मार्ग आहे. अधिकृत सर्वेक्षणांना आणि मर्यादित मनुष्यबळावर अवलंबून असल्यामुळे फार वेळ लागतो. याउलट, डिजिटल निर्मात अर्थात युट्युबर जवळजवळ दररोज गावांना भेट देतात आणि त्यांना जे दिसते ते दाखवतात. त्यांचे फुटेज अनेकदा अशा समस्यांवर प्रकाश टाकतात जे सामान्य चॅनेलद्वारे जिल्हा कार्यालयापर्यंत पोहोचू शकत नाही. जर ही माहिती ट्रॅक केली आणि पडताळली गेली तर ते गहाळ सेवा, जाती-संबंधित चिंता आणि कल्याणकारी कव्हरेजमधील तफावतींसाठी प्रारंभिक संकेत म्हणून काम करू शकते. सरकारी योजनांचे चांगले फायदे जसे एखाद्या गावात शौचालये, शाळेच्या सुविधा किंवा पाण्याची सोय नसल्याचे आढळून आले की, विभाग त्या समस्येला थेट योग्य कार्यक्रमाशी जोडू शकतात. स्वच्छ भारत अंतर्गत शौचालये समाविष्ट केली जाऊ शकतात, कमकुवत शाळा इमारती आणि गहाळ शिक्षकांना समग्र शिक्षा अंतर्गत घेतले जाऊ शकते, पिण्याच्या पाण्याच्या समस्या जल जीवन मिशनशी जोडल्या जाऊ शकतात. सामाजिक तणाव किंवा बहिष्काराचा आढावा जिल्हा प्रशासन पथकांद्वारे घेतला जाऊ शकतो यामुळे अधिकारी जलद कार्य करू शकतात आणि लोकांना त्यांच्यासाठी असलेल्या योजनांशी जोडू शकतात. जिल्हा पातळीवर एक सोपी प्रणाली प्रत्येक जिल्हा एक लहान सेल स्थापन करू शकतात जो या व्हिडिओंचे निरीक्षण करून फील्ड स्टाफद्वारे महत्त्वाच्या प्रकरणांची पडताळणी करू शकतो यामुळे जास्त खर्च न करता जनतेकडून प्रशासनाकडे माहितीचा स्थिर प्रवाह निर्माण होतो हे डिजिटल निर्मात्यांना जबाबदारीने अहवाल देण्यास देखील प्रोत्साहित करते, कारण त्यांच्या कामामुळे खऱ्या सुधारणा होऊ शकतात हे महत्त्वाचे आहे. भारतामध्ये अनेक गावे लोकांच्या नजरेपासून दूर आहेत. जेव्हा युट्युबर त्यांची स्थिती दाखवतात, तेव्हा गरज आणि कृतीमधील अंतर कमी करण्याची संधी बनते. या माहितीचा संरचित पद्धतीने वापर केल्यास विकासाला गती मिळू शकते, पारदर्शकता वाढू शकते आणि कुटुंबांना त्यांना मिळणाऱ्या लाभांचा लाभ मिळण्यास मदत होऊ शकते. समुदाय अहवाल आणि सरकारी प्रतिसाद यांचे संयोजन खरा बदल घडवून आणू शकते. जर त्याचा योग्य वापर केला तर प्रत्येक गावाला ज्या मूलभूत सेवा मिळण्यास पात्र आहे त्या जवळ जाण्यास मदत होऊ शकते. ■ ■



भगवंतजी भगत
मो. 9423788232

# आदिवासी माडिया जमातीचा डॉ. कन्ना मडावी




सशासन, प्रशासनात आदिवासी विद्यार्थ्यांना संधी प्राप्त करण्यासाठी स्मरणिका मैलाचा दगड तथा कोणते क्षेत्र निवडावे यासाठी मार्गदर्शनाचे, ज्ञान संवर्धनाचे तथा जतन करण्याचे कार्य 'अस्मिता स्मरणिका'द्वारा भविष्यात होणार आहे. महाराणी विरांगणा दुर्गावती, गढमंडला तथा नागपूर शहराचे निर्माते गोंड राजे बख्तबुलंद शाहचे फोटो(आकर्षक तथा देखणे) प्रेरणादायी असून मा. डॉ. अनुप कुमार यादव, भा. प्र. से. सचिव, मा. हिरालाल सोनवणे, आयुक्त, डॉ. राजेंद्र भारूड भा. प्र. से. आयुक्त यांनी दिलेल्या शुभेच्छापर संदेश महत्वाचा आहे. नागपूर आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त मा. रविंद्र एच. ठाकरे, भा. प्र. से. यांची प्रस्तावना आदिवासी विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासासाठी महत्वाची ठरणार आहे. शिक्षणाचे महत्व विषद करणारी प्रस्तावना आदिवासी विद्यार्थ्यांना नवी दिशा देण्याचे कार्य करेल. शिक्षणाशिवाय आदिवासी समाजाला पर्याय नाही. स्वातंत्र्यानंतर पहिली पिढी, दुसरी पिढी शिकल्याने अल्प प्रमाणात का होईना अधिकारी, कर्मचारी वर्ग 3, वर्ग 4 मध्ये शासन, प्रशासनात भारतीय संविधानाने आरक्षण कलम 342, 5 वी, 6 वी सूचीन्वये नमूद केल्यामुळे समाजात जागृती निर्माण झाली. आदिवासी समाजसमूह वर्तमानात अगणित संघर्ष करतो आहे. अज्ञान, अंधश्रद्धा आदिवासी समाजात असल्यामुळे आरक्षणाचा लाभ खऱ्या आदिवासींना हवे त्या प्रमाणात घेता आले नाही. खोट्या जातीच्या अतिक्रमाणामुळे घटनादत्त अधिकार असलेल्या खऱ्या आदिवासी समाजावर अन्याय, अत्याचार, बलात्कार एवढेच नव्हे तर मणिपूर सारख्या ठिकाणी आधुनिक विज्ञान युगात आदिवासी कुकी महिलेची नग्न धिंड भारतासारख्या महान राष्ट्राला लज्जास्पद अशी घटना. भारत हा निधर्मी राष्ट्र आहे. धर्मनिरपेक्ष भारतासारख्या महान देशात अमृत महोत्सवी वर्षात देशातील मूळनिवासी, आदिम समाजाच्या समस दिवसेंदिवस वाढत आहेत. खऱ्या आदिवासी समाजाला न्यास कधी मिळणार? हा प्रश्न समस्त भारतीयांना अस्वस्थ करणारा आहे. भारत सरकारचे धोरण सोशल मिडियात स्पष्टपणे दिसून येत नाही. आदिवासी महिलांचे संघर्ष न संपणारे आहे. विज्ञान युगातही न्यायदेवता आंधळी का? न्यायमंदिरातील डोळस दृष्य देवता म्हणजे न्यायाधिश आहेत. न्याय वेळेच्या आत अथवा वेळेची मर्यादा का नाही? उशीरा अथवा वीस वर्षानंतर मिळालेला न्याय हा सुद्धा अन्यायच असतो. न्यायमंदिरात वेळेचे बंधन असावयास हवे, न्यायाची कालमर्यादा ठरावी त्यामुळे सर्वसामान्यात न्यायालयांवर असणारा आस्था, श्रद्धा, विश्वास कायम राहील अन्यथ न्यायमंदिरे, न्यायालये ही फक्त विशिष्ट उच्च वर्गसमूहांची मक्तेदारी होऊ नये. न्यायालये लोकांना वेळेच्या आत न्याय देणारी असावीत, जेणेकरून लोकांचा विश्वास कायम राहील. न्यायालये सर्वसामान्य माणसांची चालते बोलते न्याय देणारी यंत्रणा नसून देवतांपेक्षा न्यायाधिशांना मात्र सन्मान आदरभाव कायम आहे. परंतु न्यायाचे पारडे सर्वसामान्यांपासून विशिष्ट वर्गाकडे झुकते माप असेलत तर कपटकरी कामगार आदिवासी समाजाने न्याय कुणार मागावे? निरपराधी आदिवासी विविध राज्यात मारल्या जातात दहशतवाद, नक्षलवादाच्या नावावर असे का व्हावे? यासाठी शिक्षणाची कास धरावी लागते. म्हणून आदिवासी समाजाने शिक्षणासाठी संघटीत होऊन आपल्या मुला-मुलींना उच्च कोटीचे शिक्षण देण्याचे कर्तव्य जबाबदारीने करावे. ■ ■

आदिवासी अस्तित्व



प्रा. डॉ. वामन शेळमाके
9420973248

# जगाला पर्यावरण संरक्षणाची नितांत गरज




केंजग विनाशाकडे वाटचाल करीत आहे. पृथ्वीचे संतुलन ढासळत चालले असून पर्यावरण संरक्षणासाठी जगाने एकजुटीने आणि प्रखर इच्छाशक्तीने प्रयत्न करणे अत्यावश्यक झाले आहे. वाढते प्रदूषण रोखण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना होणे ही काळाची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांनी पर्यावरणाबाबत जागतिक राजकीय व सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी 26 नोव्हेंबर 1992 पासून 'विश्व पर्यावरण संरक्षण दिवस' साजरा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे 26 नोव्हेंबर हा दिवस पर्यावरण संवर्धनाचा जागतिक संदेश देणारा दिवस ठरला आहे.

आज मानवाच्या अतीरेकामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड, खनन, नदीतील बेछूट रेती काढणे तसेच सोने-चांदी, धातू, हिरे, कोळसा व इतर खनिज संपत्तीचे अंधाधुंद उत्खनन सुरू आहे. मानवाने निसर्गाचे मूळच उपटून टाकण्याचा प्रकार सुरू केल्याने पर्यावरणाचे संतुलन गंभीर अवस्थेत पोहोचले आहे. त्यामुळे पृथ्वीतलावरील माणूस, प्राणी व पक्षी भयभीत अवस्थेत जगताना दिसतात.

भारतामध्ये पर्यावरण संरक्षणासाठी 26 मार्च 1974 रोजी गढवालमधील हेनवलघाटी येथे गौरादेवी यांच्या नेतृत्वाखाली 'चिपको आंदोलन' सुरू झाले आणि पर्यावरणसंवर्धनाची एक नवी दिशा निर्माण झाली. स्थल, जल, वायु, आकाश-पाताळ सर्वत्र प्रदूषणाचे थैमान सुरू आहे. पर्यावरण वाचवले तर जलप्रदूषण, वायुप्रदूषण आणि स्थलप्रदूषण यांवर नियंत्रण मिळविणे सहज शक्य होईल. आज इतके प्रदूषण वाढले आहे की अनेक पक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. जगभरात मोठ्या प्रमाणावर जंगलतोड सुरू असून त्याचा थेट परिणाम पर्यावरणावर होत आहे. वाढती लोकसंख्या देखील पर्यावरणाच्या ऱ्हासाचे एक मूलभूत कारण आहे. वृक्ष हा पर्यावरणाचा आधारस्तंभ आहे, त्याला जल व स्वच्छ वायूची जोड आवश्यक आहे; परंतु हेच घटक प्रदूषित झाल्याने पर्यावरण गंभीर संकटात सापडले आहे. पर्यावरणाच्या ढासळत्या अवस्थेमुळे जगातील 10 लाख प्राणी व वनस्पती प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचा इशारा देण्यात येतो. गिधाडासारखे पर्यावरणाचे महत्त्वाचे पक्षीदेखील संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत.

औषधी वनस्पतींचे मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान ही देखील अत्यंत चिंताजनक बाब आहे. जगभरातील 30टक्के वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर असून विविध देशांतील 142 प्रजाती आधीच नष्ट झाल्या आहेत. भारतातील 2603 वृक्षप्रजातींपैकी 469 प्रजाती धोकादायक अवस्थेत आहेत.

जंगल नष्ट झाल्यामुळे वन्यप्राणी अन्नाच्या शोधात शहरात व गावात घुसताना दिसतात आणि त्यामुळे मानवी जीवितहानी वाढत आहे. मानव व वन्यजीव यांच्यातील संघर्षाची स्थिती चिंताजनक बनत आहे. प्लास्टिक हे पर्यावरणाच्या नाशाचे आणखी एक भयानक कारण ठरले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी मानवाने निसर्गाचा संपूर्ण ऱ्हास घडवून आणला आहे. आज जगातील प्रदूषण, युद्धसामुग्री, अणुचाचण्या यामुळे पृथ्वी बारूदाच्या ढिगाऱ्यावर बसल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. भारताची राजधानी दिल्ली तर प्रदूषणाच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावर असून ती जणू 'गॅसचेंबर' बनल्याची अवस्था आहे. गेल्या काही वर्षांत वाढलेले महाप्रलय, सुनामी, हिमनद्या वितळणे, अती पाऊस, अती उष्णता, अती थंडी, वनवे, भूकंप, ज्वालामुखीचे उद्रेक या सर्व नैसर्गिक आपत्ती पर्यावरणाच्या ऱ्हासामुळेच घडत आहेत हे स्पष्ट आहे. म्हणूनच जगातील सर्व देशांनी वृक्ष लागवडीला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. भारतात शहरांचे सौंदर्यीकरण करण्याच्या नावाखाली होणारी जंगलतोड तातडीने थांबवली पाहिजे. सरकारने 'घर तीथे झाड' ही मोहीम राबवावी.

26 नोव्हेंबर पर्यावरण संरक्षण दिनी प्रत्येकाने आपल्या घरासमोर, अंगणात किंवा कुंडीत तरी एक झाड लावणे ही आजची गरज आहे.

वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा, पक्षांना निवारा-अन्न, मानवाला फळ-सावली व शुद्ध ऑक्सिजन मिळतो आणि पर्यावरणात आल्हाददायक वातावरण निर्माण होते. नद्या, नाले, तलाव, समुद्र प्रदूषणामुळे जलचर प्राणीही धोक्यात आले आहेत. मोबाईल टॉवरच्या अतिरेकामुळेही पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम दिसून येतात. संत तुकाराम महाराजांनी साडेतीनशे वर्षांपूर्वीच निसर्गाचे आणि पर्यावरणाचे महत्त्व आपल्या अभंगातून अधोरेखित केले आहे –

*'वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे,*
*पक्षी सुस्वरे आळविती'*

आज हा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची वेळ आली आहे. 'पर्यावरण सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित; पृथ्वी सुरक्षित तर मानव-प्राणी सुरक्षित.' ही जाणीव प्रत्येकाने मनावर बिंबवून पर्यावरण संवर्धनासाठी ठोस पावले उचलणे अत्यावश्यक आहे. ■ ■



रमेश लांजेवार
मो.– 9921690779

